## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- ७४५/२०२०/जळगांव**

१ श्री. हुसेनखान हसनखान, : अपिलार्थी
राजु गॅस वेल्डिंग दुकानाजवळ, अजमेरी गल्ली,
तांबापूर, शिरसोली रोड, जळगांव,
ता. जि. जळगांव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
१. पुरवठा अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय, जळगांव,
ता. जि. जळगांव.
२. पुरवठा हिशोब अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय, जळगांव,
ता. जि. जळगांव.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
पुरवठा तपासणी अधिकारी,
तहसिल कार्यालय, जळगांव,
ता. जि. जळगांव.

### ऑनलाईन सुनावणी दिनांक ०५/०१/२०२२

अपिलार्थी यांनी दिनांक ०४/०२/२०२० रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०५/०१/२०२२ रोजी meet.google.com/oab-scew-wjq या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून उपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकुन अनुपस्थित होते. तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून उपस्थित होते. तत्कालीन /विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

“माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल”.

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०१/२०१७ ते दिनांक १३/११/२०१९ या कालावधीतील स्वस्त धान्य दुकान क्र. ३८/३ कार्ड संख्या व वितरण बाबत माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २७/१२/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकुन यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा दिनांक १३/११/२०१९ रोजीचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला नाही, त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविता आली नाही.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक २७/१२/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दिनांक १५/०१/२०२० रोजी निर्णय पारित करुन अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती १५ दिवसांत पुरविण्याबाबतचे निर्देश जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून व जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकुन यांना देण्यात येऊन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांनी अपिलार्थीस दिनांक ३१/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. २ बाबतची कार्यालयातील उपलब्ध एकुण १ ते १५७ पृष्ठांची माहिती विनामुल्य पुरविली व सदर माहितीने समाधान न झाल्यास स्वत: कार्यालयात उपस्थित राहुन संबंधित संचिका/कागदपत्रांचे अवलोकन करुन प्रती प्राप्त करुन घेऊ शकतात, असे कळविले आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधिज जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांचेकडे अधिनियमातील कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत केला नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी तसे केल्याचे दिसुन येत नाही. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांनी प्रथम अपिलाच्या आदेशानुसार विहित कालावधीत माहिती न पुरविता १ वर्षानंतर माहिती पुरविली. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान मुद्दा क्र. १ बाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून यांनी माहिती पुरविली नसल्याचे नमुद केले. तरी आता विद्यमान जन माहिती

अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव, श्रीमती आर. आर. जाधव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव, श्री. ए. आर. जाधव यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले नाही. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधिज जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून यांचेकडे अधिनियमातील कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत केला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव, श्री. अनिल पवार यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १३/११/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिलाच्या आदेशानुसार विहित कालावधीत माहिती न पुरविता १ वर्षानंतर माहिती पुरविली. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी

खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

४) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)(क) नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्व्‍ल कारकून, श्री. ए. आर. जाधव अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) वरील निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ७४५/२०२०/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव, ता. जि. जळगांव.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. ए. आर. जाधव, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), पुरवठा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव, ता. जि. जळगांव.

३) श्री. अनिल पवार, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), पुरवठा हिशोब अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, जळगांव, ता. जि. जळगांव.

---